## शाळा हस्तांतरण करणेबाबत

शासन परिपत्रक क्रमांक : संकिर्ण-१९०९/(१३२/०९)/प्राशि-३ मंत्रालय विस्तार भवन मुंबई ३२ दिनांक १३ मे २००९

शिक्षण संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक माशास्थ/विशिउसं/२००५/१५ क दिनांक ८.१२.२००५

माध्यमिक शाळा संहिता १२.१ नुसार जेव्हा शाळेच्या व्यवस्थापनात बदल करण्याचे योजिले असेल तेव्हा असा बदल करण्यासाठी उपसंचालकांची पूर्वपरवानगी मिळावी पपाहिजे.

१२.२ मान्यताप्राप्त शाळचे एका व्यवस्थापनाकडून दुस-या व्यवस्थापनाकडे करावयाचे हस्तांतर खालील पोट नियमांच्या अधीन राहील :-

१. उपसंचालकांच्या पूर्व मान्यतेशिवाय हस्तांतर करण्यात येऊ नये
२. प्रस्तावित हस्तांतरणाकरिता उपसंचालकांस तीन महिन्यांची पूर्वसूचना दिली पाहीजे.

१२.३ उपसंचालकांस त्यांच्या स्वेच्छानिर्णयानुसार कोणत्याही शाळेस वरील पोटनियम (दोन) च्या शर्तीतून सूट देता येईल.

१२.४ वरील नियम १२.२ (एक) मध्ये नमूद केलेल्या शर्तीचे पालन केले नाही तर व्यवस्थापनात बदल केल्याच्या तारखेपासून शाळेची मान्यता आपोआपच काढून घेतली आहे असे मानले जाईल. मात्र संचालकांस विशिष्ट प्रकरणात त्यांच्या स्वेच्छेनुसार वरील १२.२ (एक) च्या शर्तीतून कोणत्याही शाळेस सूट देता येईल.

१२.५ उपसंचालकांच्या परवानगीनुसार किंवा संचालकांनी अन्यथा निर्देश दिला नसेल व वरील नियम १२.१ (एक) च्या शर्तीतून सूट दिली असेल तेव्हा नवीन व्यवस्थापकाकडे हस्तांतरीत केलेली शाळा सहाय्यक अनुदानाकरीता पात्र समजण्यात येईल.

## शाळा हस्तांतरण करणेबाबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहेत.

१. दोन्ही संस्थांचे ठराव सर्वसाधारण सभेचे

२. दोन्ही संस्थांचे करारपत्रक त्यात खालील बाबींचा समावेश असावा (स्टॅम्पपेपरवर)

  १. मुळ संस्थेची मालमत्ता कोणाकडे ठेवण्यात येणार आहे व कोणत्या अटींवर.

  २. संस्था हस्तांतरणाची कारणे कोणती

  ३. संस्थेच्या आर्थिक व्यवहाराबाबत

  ४. संस्थेचे कर्मचारी वर्गाबाबत-वेतन शासन नियमाप्रंमाणे देणे. सेवाज्यष्ठता इ. बाबत

  ५. विहित पात्रतेचे कमर्चारी नेमण्याबाबत

  ६. शाळेस नविन संस्था पुरेशा भौतिक सुविधा पुरविल्याबाबत.

  ७. विद्यार्थी प्रवेशासाठी देणगी घेण्यात येणार नसल्याबाबत

  ८. शासनाचे/खात्याचे वेळावेळी निर्गमित केलेले आदेश नवनि संस्था पाळील याबाबत

  ९. ज्या अटींवर जुन्या संस्थेस परवानगी दिलेली आहे. त्यास नविन संस्थेकडे शाळा गेल्यानंतर बदल होणार नाही

  १०. नविन संस्थेत कोणताही वाद नसल्याची हमी.

३. पी.टी. आर. उतारा दोन्ही संस्थेचे

४. धर्मादाय आयुक्त यांचे चेंज रिपोर्ट

५. कर्मचा-यांचे संमतीपत्र

६. नवनि व जुन्या संस्थेची घटना व कार्यकारी मंडळाची यादी

७. संस्था रजिस्ट्रशन सर्टिफिकेट नवी व जुनी संस्था

८. नविन संस्थेची आर्थिक स्थिती दर्शविणारी कागदपत्रे

९. नविन संस्थेमार्फत अन्य शाळा चालविण्यात येत असतील तर त्यांची पत्यासह यादी

१०. नविन संस्थेमार्फत चालविण्यात येणा-या शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली आहे काय? किंवा सदर संस्थेबाबत तक्रारी आहेत काय? याबाबत शिक्षणाधिकारी यांची स्पष्ट शिफारस.

११. सध्याची शाळेची वर्गवार विद्यार्थी संख्या व कर्मचारी संख्या (यादी).

१२. शाळेचा तपासणी अहवाल.